आयुक्त यांचे मागणी नुसार महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी प्रमाणे स्थायी समितीची **<u>विशेष सभा</u> गुरूवार दिनांक ०१/११/२०१८ रोजी दुपारी ०१.००** वाजता नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 10. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 11. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 12. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 13. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 14. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 15. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

**1.** श्री. अजिज शेख, अति. आयुक्त (2) (सामान्य)
**2.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 355ः</u>— {वित्त विभाग} महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मनपा 2018/प्र.क्र. 154/नवि 16 दिनांक 22 ऑक्टोबर 2018 नुसार नागपूर हे उपराजधानीचे शहर असल्यामुळे या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी 1995च्या धर्तीवर 2018—2019 करीता रु. 150 कोटी इतके विशेष सहाय्य अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयानुसार हया विशेष अनुदानातुन हाती घ्यावयाच्या कामाचे स्वरुप, प्रशासकीय मान्यता इत्यादी सर्व बाबी व धोरण

दिनांक 12 डिसेंबर 2017 चे शासन निर्णयाचे विहीत केल्यानुसार लागू राहतील व मनपाचा 25 टक्के हिस्सा उभारण्याची अट हया विशेष अनुदानापोटी लागू राहणार नाही असे नमूद केले आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मनपा 2018/प्र.क्र. 154/नवि 16 दिनांक 29 ऑक्टोबर 2018 नुसार समक्रमांकांचा दि. 22 ऑक्टोंबर 2018 चा शासन निर्णय अधिक्रमित करुन नागपूर हे उपराजधानीचे शहर असल्यामुळे हया शहराच्या सर्वांगीण विकासासाठी 1995 च्या धर्तीवर 2018–2019 करीता विशेष सहाय्य अनुदान रु. 150 कोटी खालील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात आलेले आहे.

1) नागपूर हे उपराजधानी असल्यामुळे त्या अनुषंगाने त्या शहराच्या विशिष्ट गरजा भागविण्यासाठी या विशेष सहाय्य अनुदानातुन विशिष्ट कार्यक्रमांची आखणी करण्याचा, विविध कामांचा प्राथम्य क्रम ठरविण्याचा व त्याची अंमलबजावणी करण्याचा संपूर्ण अधिकार नागपूर महानगरपालिकेस राहील.

2) या निधीतुन नागपूर महानगरपालिकेने त्यांच्या प्राथम्य क्रमानुसार कामांची, खर्चाची उद्दिष्टे निवडावीत व त्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या मान्यतेने कामे हाती घ्यावीत. या निधीचा सुयोग्य कारणांसाठी वापर करण्याचे संपूर्ण जबाबदारी नागपूर महानगरपालिकेची राहील.

वर नमूद शासन निर्णया नुसार नागपूर महानगरपालिकेला उपराजधानी नागपूर शहराच्या विकासासाठी शासनाकडुन रु. 150 कोटी विशेष सहाय्य अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. या विशेष सहाय्य अनुदानाच्या रक्कमेमधुन विशिष्ट कार्यक्रमांची आखणी करणे, विविध कामांचा प्राथम्य क्रम ठरविणे खर्चाची उद्दिष्टे निवडणे याकरिता स्थायी समितीचे मान्यतेस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन ज्याअर्थी राज्य शासनाने 2018–2019 करिता विशेष सहाय्य अनुदान रू. 150 कोटी मंजूर केलेले आहे. त्यात काही अटींचा समावेश आहे. त्याअर्थी प्राथम्य क्रमानुसार कामांची, खर्चाची उद्दीष्टे निवडावीत त्यानुसार स्थायी समितीची मान्यता घ्यावी असे स्पष्ट केले आहे. करिता या निधीचा योग्य पध्दतीने विनियोग करण्याच्या दृष्टीने आयुक्त, म.न.पा. यांनी प्राथम्य क्रमानुसार कामांची व खर्चाची उद्दीष्ट निवडुन सुव्यवस्थीत व नियोजनबध्द प्रस्ताव सादर करण्याचे अधिकार ही स्थायी समिती आयुक्त, म.न.पा. यांना एकमताने प्रदान करते. आणखी असे की, आयुक्त यांनी तसा प्रस्ताव सभापती, स्थायी समिती यांचे समक्ष ठेऊन त्यांची मान्यता घ्यावी. या प्रस्तावा संबंधी मंजूरी प्रदान करण्याचे अधिकार ही स्थायी समिती सभापती यांना देण्यास एकमताने मंजुरी प्रदान करते या सुचनेसह विषय समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 356</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर